# जाहिरात
## प्राथमिक शिक्षण विभाग
## पुणे महानगरपालिका

पुणे मनपाच्या सद्यस्थितीत सुरु असणाऱ्या मनपा शाळा क्र.२५ जी घोरपडे पेठ आणि मनपा ८२ जी कोंढवा खुर्द येथील एस.एस.सी बोर्डाचा अभ्यासक्रम असलेल्या इंग्रजी माध्यमाच्या दोन शाळा चालविणेबाबत महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली २००८ आणि शिक्षण हक्क कायदा विचारात घेऊन **जाहीर प्रकटन देऊन मनपा शाळा चालविण्याचा संयुक्त शैक्षणिक प्रकल्पाकरिता** पुणे महानगरपालिकेच्या वेबसाईटवर अटी व शर्ती नमूद करून **स्वारस्याची अभिव्यक्ती / ExpressionofInterest**प्रसिद्ध करीत आहोत.

शिक्षण हक्क कायदा , शिक्षण हक्क नियमानुसार विद्यार्थांना मोफत सार्वत्रिक दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देणेकामी पुणे महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत प्राथमिक शिक्षण क्षेत्रातील शैक्षणिक / सामाजिक  अनुभव असलेल्या शैक्षणिक / सामाजिक संस्थांना सहभागी करून त्यांचे मदतीने व सहकार्याने संयुक्तपणे राबविण्यात येणारा शैक्षणिक प्रकल्प करणेकामी मनपा मालकीच्या व ताब्यातील या सद्यस्थितीत सुरु असलेल्या शाळेचे शैक्षणिक व्यवस्थापन चालविण्याची पूर्ण जबाबदारी सोपविण्याचे आहे.

ज्या इच्छुक नोंदणीकृत शैक्षणिक / सामाजिक संस्था विहित अटी व शर्तीची पूर्तता करिता आहेत अशा  संस्थांनी संपूर्ण कागदपत्रांसह आपले परिपूर्ण प्रस्ताव जाहीर प्रकटनाच्या दिनांकापासून पंधरा दिवसापर्यंत प्रशासकीय अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग) , पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय , जुना तोफखाना , शिवाजीनगर , पुणे ४११००५ येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत.विहित निकष पूर्ण न करणारे व नमूद कालावधी नंतर आलेले प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

मनपा शाळा चालविण्याचा संयुक्त शैक्षणिक प्रकल्पविषयक प्रस्तावासाठी विहित करण्यात आलेल्याअटी व शर्ती (**www.pmc.gov.in**) या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.

स्वाक्षरी : **XXX**
प्रशासकीय अधिकारी
प्राथमिक शिक्षण विभाग ,
पुणे महानगरपालिका

जाहीर प्रकटनाद्वारे संस्था अटी व शर्ती निवडीचे निकष : संस्थेने सादर करावयाची कागदपत्रे

१ कायद्याप्रमाणे नोंदणीकृत संस्था (न्यास/संस्था/कंपनी) नोंदणी सन १९५०/ सन १८६० / कंपनी कायदा २०१३ ) : अव्यावसायिक ( not for profit ) , समाजोपयोगी ना नफा ना तोटा तत्वावर चालणाऱ्या शैक्षणिक / सामाजिक संस्था, धर्मादाय आयुक्त यांचेकडील नोंदणीकृत शैक्षणिक/सामाजिक संस्था ज्या शैक्षणिक/सामाजिक संस्थांना शासनाचे नियमानुसार संस्था चालविण्याचे प्रमाणपत्र दिले असेल अशा शैक्षणिक / सामाजिक संस्था

२ शैक्षणिक / सामाजिक अनुभव असलेल्या शैक्षणिक / सामाजिक संस्था : मान्यताप्राप्त पूर्व प्राथमिकसह प्राथमिक शाळा चालविण्याचा किमान १५ वर्षांचा अनुभव असावा.(चालवीत असलेल्या शाळेचे नाव व ठिकाण ,..इ सविस्तर माहिती जोडणे)

३ किमान पाच वर्षात केलेल्या शैक्षणिक /सामाजिक कार्याचा अहवाल व सक्षम अधिकाऱ्यांकडून तपासलेला आर्थिक ताळेबंद अहवाल सादर केलेला असेल अशा , संस्थेस गेल्या तीन वर्षातील ऑडीट स्टेटमेंटमध्ये प्रतिकूल शेरे नसावेत. (स्टेटमेंट अथवा कंपनीबाबत आयकर विवरणपत्र लेखा परीक्षण अहवाल , ताळेबंद ,.)

४ संस्था पुण्यातील स्थित असावी.

५ संस्थेकडे युनिक आयडी क्रमांक असावा.आणि ८० जी / १२ ए प्रमाणपत्र असावे.

६ न्यास/संस्थाचीप्रमाणित घटनेची प्रत / कंपनीबाबत MOA ( memorandum of association)

७ संस्थेच्या व्यवस्थापन मंडळात वाद नसावा. वाद असल्यास अशी संस्था अपात्र समजली जाईल. (संस्थेचे अध्यक्ष सचिव यांचे १०० रु stamppaper वर नोंदणीकृत प्रतिज्ञापत्र)

८ संस्था अर्थिक दृष्ट्या सक्षम असावी.

९ महानगरपालिकेच्या या शाळांमधून दुर्बल, वंचित, विकलांग,शालाबाह्य, स्थलांतरित कुटुंबातील आणि प्रवेशित सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणे बंधनकारक राहील.( हमीपत्र)

१० शालेय जागेची / इमारतीची मालकी मनपाकडे राहील. इमारतीचा वापर फक्त शैक्षणिक कार्याकरिता करावयाचा आहे याकरिता

सोपविण्यात येईल. याबाबत लेखी सामंजस्य करार करून प्रायोगिक तत्वावर ५ वर्षांकरिता आणि कामकाज समाधानकारक असल्यास कमाल ३० वर्ष पर्यंत त्याची मर्यादा निश्चित करतील.

११ शालेय इमारत आणि अध्ययन साहित्य यासह पायाभूत सुविधा मनपा पुरवील : सर्वसामान्य मनपा शाळांमधून विद्यार्थांना पुरविण्यात येणाऱ्या शैक्षणिक व शालेय साहित्य सुविधा व योजना (जसे डीबीटी , माध्यान्ह भोजन, गणवेश ,पाठ्यपुस्तके, गणवेश,..) , फर्निचर मनपा उपलब्ध करेल. इमारत, आवश्यक वर्गखोल्या, आवार - क्रीडांगण,स्वच्छतागृह, विद्युत व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ,अग्निशमन व्यवस्था ,अन्य भौतिक सुविधा बाबतची पूर्तता , देखभाल व रखरखाव-दुरुस्ती ( maintainance ) मनपामार्फत होईल.

१२ RTE निकषानुसार (कर्मचारी वृंद प्रमाणके-पर्याप्त अर्हताप्राप्त),शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती व वेतन-वेतनेतर अनुदान निवृत्ती वेतन व अन्य कोणत्याही बाबी व सर्व जबाबदारी व दायित्वसंस्थेने स्वीकारून कोणताही आर्थिक भार मनपावर येणार नाही, संस्थेस मनपाकडे कोणताही निधी मागता येणार नाही. संस्थेने स्वनिधीतून खर्च करावा. सी.एस.आर./ लोकसहभागातून खर्च भागवित असल्यास संबंधित कायदा/ कंपनी कायदा २०१३ च्या तरतुदींची पूर्तता करणेची संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.( हमीपत्र)

१३ शिक्षण हक्क कायद्यातील मानके आणि प्रमाणके मान्यतेच्या अट व शर्ती चे पालन आणि शिक्षण हक्क नियमातील अटी व शर्तीनुसार कामकाज करावयाचे आहे. शासनाकडून शाळा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी इ. संदर्भात वेळोवेळी करण्यात येणारे अधिनियम नियम आदेश इ. चे पालन संस्थेने करणे आवश्यक राहील. विहित केलेल्या सर्व अटी व शर्तीचे आणि वेळोवेळी लागू होणारे शिक्षण विभागातील सर्व (विद्यार्थी वाहतूक विषयक , विद्यार्थी सुरक्षितता,विद्यार्थी व शिक्षक - तक्रार निवारण यंत्रणा, शिष्यवृत्त्या ,शासकीय विद्यार्थी वैयक्तिक सह सर्व लाभाच्या योजनां, दिव्यांग विद्यार्थी, आपत्ती व्यवस्थापन विषयक, साथरोग, कोव्हिड नियमावली सह,.अन्य सर्व) निगडीत कायदे , नियम , धोरणे, शासन निर्णय,परिपत्रके ,पत्रे ,सूचना ,आदेश , निर्देश , amendments यांचे पालन न केल्यास कायद्यानुसार कारवाईस संस्था पात्र व जबाबदार राहील. राज्य शासनाचे त्या त्या वर्गाचे शालेय

अभ्यासक्रम ,शासनाचे शैक्षणिक धोरण, परीक्षा पद्धती, शैक्षणिक दिनदर्शिका (वेळापत्रक) , विद्यार्थी शिक्षक प्रमाण, विद्यार्थी पटसंख्या , आधार , यु आय डी , यु डायस , सरल विषयक नोंदी , पालक शाळा व्यवस्थापन समिती, बायोमेट्रीक हजेरी इत्यादींचे सदर संस्थेने पालन करणे बंधनकारक राहील. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , मनपा शिक्षण विभाग यांच्या व्यतिरिक्त राबविण्यात येणाऱ्या सर्व शालेय , सह शालेय उपक्रम व खेळ ( सहल समारंभ कार्यक्रम योजना स्पर्धा अवांतर परीक्षा ,..) यास पूर्व मान्यता आवश्यक असून शालेय वेळेव्यतिरिक्त अन्य उपक्रम मनपाच्या पूर्व परवानगीशिवाय राबविता येणार नाहीत.( हमीपत्र)

१४ शालेय पट संख्या वाढवून , प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत सर्व वर्ग दोन वर्षात प्रगत करावेत, शाळा सिद्धी मध्ये सहभाग व दोन वर्षात “अ” दर्जा आणि प्राविण्यासह पुढील तीन वर्षांचे निकाल, शिष्यवृत्ती – (इ५वी,इ ८वी,एनटीएस,एमटीएस),दर्जेदार असावेत. (शासन मान्य) एनसीसी, स्काऊट, गाईड, एनएसएस उपक्रम कार्यरत ठेवून त्यात प्राविण्य असणे आवश्यक राहील.आणि किमान चार मैदानी खेळ प्रकारासह किमान पाच क्रीडा प्रकार सुविधेसह शिकविणे आणि प्राविण्य असणे आवश्यक राहील. ग्रंथालय ,प्रयोगशाळा, डिजिटल शिक्षण ,तंत्रस्नेही शिक्षक, ई साहित्य वापर, आंतरजाल सर्व माहिती व तंत्रज्ञान सुविधेसह शिक्षकांना निरंतर प्रशिक्षण देऊन शाळा दर्जेदार करणे आवश्यक राहील. (हमीपत्र)

१५ शिक्षण हक्क कायदा, स्वयं अर्थसहाय्यीत शाळा अधिनियम, कंपनी कायदा व लागू असलेल्या शिक्षण विषयक कायद्यातील तरतुदीनुसार शालेय सनियंत्रण स्थानिक प्राधिकरणाचे राहील , नियतकालीन शैक्षणिक तपासणी, पर्यवेक्षण अधीक्षण, निदेश व नियंत्रण मनपाकडे राहील. दर सहा महिन्याने गुणवत्तेतील प्रगती आणि सुविधाबाबत बैठक घेऊन एकंदरीत शैक्षणिक गुणवत्तेचा आढावा प्राथमिक शिक्षण विभागास सादर करणे आवश्यक राहील.

१६ योग्य वाटतील अशा अट शर्ती ठरविणेचा अधिकार मा आयुक्तास राहील. वरील विशिष्ट हेतूचे उलंघन, भंग अथवा अटीनुसार चालविण्यात येत नसल्यास / अनुपालन न झाल्यास / निष्कासन करून प्रकल्प बंद करणे , मान्यता रद्द करून, निर्बंध लादण्याचा, शास्ती करण्याचा अधिकार आयुक्तास असेल, व्यवस्थापन काढून घेण्याचे

अधिकार नियमावली २००८ च्या भाग १२ नुसार आयुक्तास राहील ,सदरची संस्था योग्य काम अथवा नियमांचे पालन करीत नाही असे केंव्हाही मत झाल्यास मा.महापालिका आयुक्त हा करार तात्काळ संपुष्टात आणू शकतील.

१७ प्रस्ताव पडताळणी समितीचे पदाधिकारी मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त ( विशेष) तथा अध्यक्ष, मा मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा सदस्य, मां.मुख्य विधी अधिकारी तथा सदस्य मा उपायुक्त मालमत्ता व व्यवस्थापन तथा सदस्य मा शिक्षणाधिकारी (माध्यमिक व तांत्रिक शिक्षण) तथा सदस्य मा.प्रशासकीय अधिकारी ( प्राथमिक शिक्षण ) तथा सदस्य सचिव यांचेमार्फत पडताळणी होऊनसुयोग्य संस्थेच्या निवडीनंतर मा.स्थायी समिती आणि मा.मुख्य सभेपुढे निर्णयार्थ ठेऊन,निर्णय होऊन मान्यता दिल्यास करारनामा केला जाईल.त्यापुढे सामंजस्य करार होऊन प्रकल्प चालविण्यात येईल.वरील निकषांची पूर्तता करणारे प्रस्ताव स्वीकारले जातील.मुदतीनंतर आलेले तसेच अपूर्ण प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.कोणताही प्रस्ताव स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार मा. महापालिका आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांना राहील.

स्वाक्षरी : XXX
प्रशासकीय अधिकारी
प्राथमिक शिक्षण विभाग ,
पुणे महानगरपालिका